# उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व डॉ. होमी भाभा स्टेट युनिवर्सिटी मुंबई यांनी राबवलेल्या स्कूल कनेक्ट प्रोग्राम अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलबजावणीसंबंधित आयोजित केलेली व्याख्याने व चर्चासत्रे याविषयीचा अहवाल

**प्रा. उल्हास का. पाटील,**
सूक्ष्म जीवशास्त्र विभाग, विज्ञान संस्था, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई
(दिनांक : २७ व २९ जानेवारी २०२४)

## १. स्कूल कनेक्ट प्रोग्राम अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलबजावणीसंबंधित व्हॅलूनटरी माध्यमिक विद्यालय, व कनिष्ठ महाविद्यालय, शहादा थेथे आयोजित केलेले व्याख्यान व चर्चासत्र

**शहादा २७ जानेवारी २०२४**: शिक्षण व्यवस्थेत क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने शालेय स्तरावर राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन सक्रीयपणे काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत मुंबईच्या डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे तज्ज्ञ राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहचुन विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करीत आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या व्यावहारिक पैलूंची माहिती देन्यायासाठी विद्यापीठातील विज्ञान संस्थेतील प्राध्यापक डॉ. उल्हास पाटील यांनी व्हॅलूनटरी माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, शहादा येथे व्याख्यान दिले (दिनांक: २७ जानेवारी २०२४; वेळ दुपारी ११.३०). नववी ते बारावीपर्यंतल्या <u>**एकूण २४४**</u> विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. विध्यार्थ्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील लवचिकता (flexibility) आणि कौशल्यांची (Skills) उत्साहाने विचारपूस केल्याने त्यांची उत्सुकता स्पष्ट झाली. श्रीमती ज्योती तिरमाळे यांनी सूत्रसंचालन केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.नयना पाटील उपस्थित होत्या. वॉलंटरी सोसायटी चे सचिव मा. राजेश भाई कुलकर्णी यांनी या उपक्रमाबद्दल शुभेच्छा व अभिनंदन केले. या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षण व्यवस्थेत या धोरणामुळे होणाऱ्या परिवर्तनीय बदलांची सखोल माहिती मिळू शकली.

## २. स्कूल कनेक्ट प्रोग्राम अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलबजावणीसंबंधित वरिष्ठ कला महिला महाविद्यलय, शहादा थेथे आयोजित केलेले व्याख्यान व चर्चासत्र

**सोनवद शहादा २७ जानेवारी २०२४**: शिक्षण व्यवस्थेत क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने शालेय स्तरावर राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन सक्रीयपणे काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत मुंबईच्या डॉ. होमी

भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे तज्ज्ञ राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहचुन विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करीत आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या व्यावहारिक पैलूंची माहिती देन्यायासाठी विद्यापीठातील विज्ञान संस्थेतील प्राध्यापक डॉ. उल्हास पाटील यांनी वरिष्ठ कला महिला महाविद्यलय, शहादा यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सोनवद ता. शहादा जि. नंदुरबार येथे व्याख्यान दिले (दिनांक: २७ जानेवारी २०२४; वेळ दुपारी २.३०). **<u>एकूण ६५</u>** विद्यार्थ्यांनिंनी यात सहभाग नोंदवला. डॉ. खेमराज पाटील यांनी सूत्रसंचालन केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आय जे. पाटील उपस्थित होते. संस्थचे अध्यक्ष मा. मोतीलाल पाटील यांनी या उपक्रमाबद्दल शुभेच्छा व अभिनंदन केले. या चर्चासत्रामुळे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनिंना त्यांच्या शिक्षण व्यवस्थेत या धोरणामुळे होणाऱ्या परिवर्तनीय बदलांची सखोल माहिती मिळू शकली.

### ३. स्कूल कनेक्ट प्रोग्राम अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलबजावणीसंबंधित आर. सी पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यलय, शिरपूर येथे आयोजित केलेले व्याख्यान व चर्चासत्र

**शिरपूर २९ जानेवारी २०२४**: शिक्षण व्यवस्थेत क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने शालेय स्तरावर राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन सक्रीयपणे काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत मुंबईच्या डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटीचे तज्ज्ञ राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहचुन विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करीत आहे. या अनुषंगाने राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या व्यावहारिक पैलूंची माहिती देन्यायासाठी विद्यापीठातील विज्ञान संस्थेतील प्राध्यापक डॉ. उल्हास पाटील यांनी आर. सी पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यलय, शिरपूर येथे व्याख्यान दिले (दिनांक: २९ जानेवारी २०२४; वेळ दुपारी ११.३०). **<u>एकूण ४१</u>** विद्यार्थ्यांनी व २० शिक्षकांनी सहभाग नोंदवला. डॉ. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य वैशाली पाटील, संचालिका आर. सी पटेल व्यवस्थापनव संशोधन संस्था व डॉ. अरुण पाटील उप-प्राचार्य, आर. सी पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यलय उपस्थित होते. संस्थचे अध्यक्ष मा. अमरीशभाई पटेल, मा. भूपेश भाई पटेल व सचिव मा. राजगोपालजी भंडारी यांनी या उपक्रमाबद्दल शुभेच्छा व अभिनंदन केले. या चर्चासत्रामुळे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षण व्यवस्थेत या धोरणामुळे होणाऱ्या परिवर्तनीय बदलांची सखोल माहिती मिळू शकली.

**स्कूल कनेक्ट प्रोग्राम:** महाराष्ट्र सरकारने सुरू केलेला स्कूल कनेक्ट कार्यक्रम हा राज्यभरातील शाळांशी व महाविद्यालयांशी शैक्षणिक तज्ज्ञांना जोडण्यासाठी एक सक्रिय पाऊल आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा असून, त्याचा लाभ प्रत्येक विद्यार्थी व शिक्षकापर्यंत पोहोचतो. अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकविसाव्या शतकातील

आव्हानांसाठी तयार करणारी सर्वसमावेशक आणि गतिमान शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध आहे. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ राज्यातील शिक्षणाचे भवितव्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या स्कूल कनेक्ट प्रोग्राम अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंमलबजावणी शैक्षणिक उत्कृष्टता व एकूणच विद्यार्थी विकासासाठी मला योगदान देता आले हे माझे भाग्य सामझतो. डॉ होमी भाभा विद्यापीठाचे कुलगुरू मा. **प्रा. रजनीश कामत, कुलसचिव मा. प्रा. विलास पाध्ये, उपक्रमाचे समन्वयक प्रा. बाणेवार आणि विज्ञान संस्थेचे संचालक मा. प्रा. श्रीनिवास कुळकर्णी यांनी मला संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार**. सदर उपक्रम हा एक समृद्ध अनुभव होता ज्यामुळे विद्यापीठाची शिक्षणाप्रती असलेली तळमळ आणि राज्यातील विदयार्थ्यांना घडविण्याच्या भूमिकेबद्दल मलाही योगदान देता आले.







**व्हॅलूनटरी माध्यमिक विद्यालय, व कनिष्ठ महाविद्यालय, शहादा**



**वरिष्ठ कला महिला महाविद्यलय, शहादा (सोनवद)**



**आर. सी पटेल वरिष्ठ महाविद्यलय, शिरपूर**

लोकमत



शहादा येथे विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ.उल्हास पाटील.

# नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** शहादा शहरातील सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककांतर्गत तालुक्यातील सोनवद येथे विशेष हिवाळी निवासी शिबिर सुरू आहे. या शिबिरात महाविद्यालयातील आयक्यूएसी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी 'नवीन शैक्षणिक धोरण २०-२०' या विषयावर व्याख्यान झाले.

याप्रसंगी डॉ. होमी भाभा स्टेट युनिवर्सिटी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मुंबई येथील सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ प्रोफेसर डॉ. उल्हास पाटील उपस्थित होते. डॉ. उल्हास पाटील यांनी विद्यार्थिनींना विविध उदाहरणांसह नवीन शैक्षणिक धोरणाविषयी माहिती दिली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आय. जे. पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून पोलिस पाटील दर्शना पाटील, धुळे-नंदुरबार जिल्ह्याचे राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक प्रा. काकासो अनपट महाविद्यालयातील समन्वयक डॉ. कैलास चव्हाण उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आय. जे. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. खेमराज पाटील तर आभार डॉ. कैलास चव्हाण यांनी मानले.

कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, व्हा. चेअरमन हिरालाल पटेल, संचालक अभिजित पाटील, महाविद्यालय विकास समिती सदस्या प्रीती पाटील व संचालक मंडळाने शुभेच्छा दिल्या.

Hello Nandurbar
Page No. 2 Jan 31, 2024
Powered by: erelego.com